**<u>नागपूर सुधार प्रन्यास</u>**

नागपूर सुधार प्रन्यासच्या जागेवर बसलेल्या अतिक्रमणधारी झोपडपट्टीवासीयांना मालकी हक्काने पट्टेवाटप करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**नगरविकास विभाग,**
**शासन निर्णय - क्रमांक-नासुप्र-२०१५/प्र.क्र.५३/नवि-२६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ ऑगस्ट,२०१६

**<u>वाचा</u> :-**

१) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे पत्र क्र.अधी.अभि./५१९९, दिनांक १९/०८/२०१५, पत्र आणि पत्र क्र.अधी.अभि/३९५८ दि.२८/०७/२०१६,

२) कार्यकारी अभियंता (मुख्यालय), नागपूर सुधार प्रन्यास यांचे पत्र क्र.का.अ.(मु)/१०२२० दिनांक १५/०१/२०१६ व पत्र क्र.अधी.अभि./११२०७ दिनांक ०३/०१/२०१६

३) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**<u>प्रस्तावना :</u>**

नागपूर शहरातील विविध भागात नागपूर महानगरपालिका, नझूल / शासन, रेल्वे, नागपूर सुधार प्रन्यास व खाजगी मालकीच्या जागांवर झोपडपट्टया वसलेल्या आहेत. झोपडपट्टीला गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करणे व या अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. यास अनुलक्षून, नागपूर शहरातील बहुतेक झोपडपट्टयांना नागपूर महानगरपालिकेने गलिच्छ (स्लम) वस्ती घोषीत केलेले आहे. तद्नंतर या झोपडपट्टीवासियांनी वेळोवेळी त्यांच्या झोपडपट्टी वस्तीमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याची मागणी, लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून शासनाकडे केली आहे. त्यामुळे गलिच्छ वस्ती सुधारणा योजना, विविध शासकीय निधीतून या ठिकाणी आहे त्या स्थितीत मुलभूत सुविधा जसे रस्ते मलवाहिका, रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या वाहिका, विद्युतीकरण इत्यादी पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच बहुतांश झोपडपट्टीधारकांकडे प्रसाधनगृहाची सुविधा आहेत.

याच अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागेवर वसलेल्या झोपडपट्टयाचा आहे त्या स्थितीत नियोजनबध्द विकास करण्यासाठी जसे, रस्ते, मलवाहिका, पिण्याच्या पाण्याच्या वाहिका, पर्जन्यवाहिका इ. नागरी सुविधांसाठी प्रत्यक्षात लागणारा खर्च व जमिनीची किंमत म्हणून भूसंपादनासाठी लागलेला खर्च झोपडपट्टी धारकाकडून वसूल करुन, त्यांना नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग नियम १९८३ च्या तरतुदीनुसार पट्टेवाटप करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधीकडून करण्यात येत होती. त्याअनुषगाने उक्त संदर्भाधीन क्र.०१ व व ०२ येथील पत्रान्वये नागपूर सुधार प्रन्यासकडून आवश्यक तो प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता.

याच विषयासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार नागपूर सुधार प्रन्यासच्या जागेवर अनधिकृतरित्या वसलेल्या झोपडपट्टीधारकांना थेट पट्टेवाटप करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग नियम १९८३ च्या नियम २६ अंतर्गत शासनास असलेल्या अधिकारात नियम ५(२) खाली सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :

नागपूर सुधार प्रन्यासाच्या मालकीच्या जागेवर वसलेल्या झोपडपट्टयातील धारकांना मालकीहक्काने पट्टेवाटप करण्यासाठी, नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळ ठराव क्र.११/११४८ (तहकुब) दिनांक १४/०७/२०१५ अनुसार झालेला ठराव, संदर्भाधीन क्र.०३ येथील इतिवृत्तानुसार झालेला निर्णय व सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी दिनांक १९/०८/२०१५ व दिनांक २८/७/२०१६ च्या पत्रान्वये सादर केलेले प्रस्ताव यांच्या अनुषंगाने, प्रन्यासाच्या जागेवरील झोपडपट्टयातील धारकांना थेट पट्टेवाटप करण्यासंदर्भात **नागपूर सुधार प्रन्यास जमिन विनियोग नियम, १९८३ मधील नियम २६ नुसार शासनास असलेल्या अधिकारात नियम ५(२) अनुसार जाहिर आवेदन मागविण्याची अट खालील अटी व शर्तीवर शिथील करण्यात येत आहे.**

## अटी व शर्ती :-

१) नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागेवरील प्रस्तावाधीन अभिन्यासांमध्ये पट्टे वाटप करताना विकास नियंत्रण नियमावलीनुसार ज्या न्यूनतम सुधारणा करणे आवश्यक आहे त्या बाबतीत सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी अशा सुधारणा त्यांचे स्तरावर असलेल्या अधिकारात कराव्यात.

२) उपरोक्त प्रमाणे पट्टे वाटप करताना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील व विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार आवश्यक आरक्षणे ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

३) दिनांक २६/४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, गलिच्छ वस्ती म्हणून घोषित वसाहतीतील धारकांना पट्टेवाटप करताना अनुसूचित जाती / अनुसूचीत जमाती / इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, इत्यादी प्रवर्गांना अधिमूल्याची आकारणी न करता वाटप करण्यात यावे. उर्वरित घटकांच्या बाबतीत ५०० चौ.फू. क्षेत्रापर्यंत अधिमूल्याची आकारणी करण्यात येऊ नये. सदरची सवलत फक्त रहिवास प्रयोजनासाठीच असेल.

४) पट्टे वाटप करताना नागपूर सुधार प्रन्यासच्या ठराव क्र.११/११४८ (तहकुब) दिनांक १४/०७/२०१५ अनुसार शिघ्रसिध्द गणकानुसार (रेडीरेकनर) वाणिज्यिक प्रयोजनासाठी १०० टक्के व रहिवासी वापरासाठी ५० टक्के प्रमाणे अधिमूल्याची आकारणी करण्यात यावी.

## इतर अटी व शर्ती :-

(१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार आवश्यक कार्यवाही तसेच नागपूर शहर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार तसेच या जमीनीस लागू असलेल्या कायद्यानुसार आवश्यक त्या मंजु-या / परवानग्या घेण्याबाबतची कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासने करावी.

(२) अशा जमीनीबाबत मा.न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले आदेश याबाबतची तपासणी करुन, त्याबाबतची विहित कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासने करावी.

(३) दिनांक २६/४/२०१६ च्या बैठकीतील निर्णयानुसार दिनांक ०१/०१/२००० पूर्वीच्या पुरावा धारकांना या योजनेकरिता पात्र ठरविण्यात यावे.

(४) वसाहतीतील भूखंडांचे वाटप करता यावे, याकरिता संबंधित वसाहतींचा अभिन्यास तयार करण्यात यावा. असा अभिन्यास तयार करण्यात आल्यानंतर सद्य:स्थितीप्रमाणे वाटप करण्यात यावे. मात्र संबंधित वसाहतींचा पुनर्विकास करताना अभिन्यासानुसार तो करणे बंधनकारक राहील.

(५) पट्टेवाटप करताना करारनाम्यामध्ये पती व पत्नी अशी दोघांची नावे समाविष्ट करण्यात यावीत.

(६) या विषयासंदर्भात  मंत्री, केंद्रीय रस्ते वाहतुक, जहाज बांधणी विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०१/२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात नमूद केलेल्या अन्य अटी व शर्ती

(७) याशिवाय सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना आवश्यक वाटत असलेल्या व नागपूर सुधार प्रन्यासच्या विविध ठरावांद्वारे विहीत केलेल्या अटी व शर्ती.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८२४१७२४५२९९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.08.24 17:26:01 +05'30'

**(ज.ना.पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर
३) जिल्हाधिकारी नागपूर, नागपूर
४) सचिव (नवि-२) यांचे वि.का.अ.
५) उप सचिव (नवि-२६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवडनस्ती, कार्यासन नवि-२६.